


| वर्ष - 9 | अंक -15 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

## आतील पानांत


- तू क्रिकेटचे सौंदर्य जिवंत ठेवले!
- अक्षर पटेलवर दुहेरी संकट!
- भटक्या कुत्र्यांचा मी आभारी आहे
- आमचे ग्राहक टॅरिफसाठी तयार


www.mahaenews.com | सोमवार, दि. 1 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नीरा येथे तणाव: हल्ल्याचा दावा, व्हिडीओत स्पष्टता नाही; पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले

# मराठा आरक्षणावरून संघर्ष तीव्र!

### हाके व मराठा आंदोलक आमनेसामने; ओबीसी नेत्याचा आपल्यावर हल्ला झाल्याचा दावा

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मोठा दावा केला आहे. नीराकडून लोणंदच्या दिशेला जात असताना माझ्यावर हल्ला झाला, असा मोठा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. नीरा गावाजवळ हा हल्ला झाल्याचा आरोप हाके यांनी केला आहे. आपण चहा पिण्यासाठी थांबलेलो असताना आपल्यावर हल्ला झाला, असा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. खरंतर लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलकांचा एकमेकांना भिडण्याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. या व्हिडीओत हल्ला झाल्याचं स्पष्ट दिसत नाही. पण लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक यांच्यात तू तू मैं मैं होताना दिसत आहे. या घटनेनंतर लक्ष्मण हाकेंनी आपल्यावर हल्ला झाल्याचा दावा केला आहे.**



## परिसरात तणावपूर्ण वातावरण

नीराकडून लोणंदच्या दिशेने जात असताना निरा येथे चहा पिण्यासाठी थांबलेले असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक भिडले. पुणे जिल्ह्यातील नीरा या गावी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना मराठा आंदोलक भेटले. हाके यांचा सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये बोरी या गावी एक कार्यक्रम होता. त्यासाठी ते निघाले होते. पण नीरा येथे थांबले असताना लक्ष्मण हाके यांच्यासमोर काही मराठा आंदोलक आले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी लक्ष्मण हाके यांनी थेट रस्त्यावर बसूनच या सगळ्या विरोधी आंदोलनाचा निषेध व्यक्त केला.

शरद पवारांनी वाटोळं केलं', लेकीसमोर आंदोलकांच्या घोषणा, गाडीवर बॉटल फेकल्या, गर्दीत घेरलं; आंदोलनस्थळी काय काय घडलं? 'प्रिया तू खूप लवकर आम्हाला सोडून गेलीस...' मराठी कलाकारांना मोठा धक्का; संपूर्ण इंडस्ट्री शोकाकुल प्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रिया मराठे यांचं निधन, घरचा प्रत्येक कोपरा तिच्या सारखाच साधा या वास्तुत आहेत आयुष्यभराच्या आठवणी

### नेमकं काय घडलं?

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील नीरा येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या विरोधात मराठा तरुणांनी जोरदार घोषणाबाजी केली. हाके हे नीरा येथील एका हॉटेलमध्ये थांबले असताना ही घटना घडली. मराठा तरुणांना याची माहिती मिळताच त्यांनी हॉटेलबाहेर जमून हाके यांच्याविरोधात घोषणा दिल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही तरुणांना ताब्यात घेतले.

सध्या मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्य सरकारकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने मराठा समाजात संतापाचे वातावरण आहे. याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी मराठा आंदोलना विरोधात केलेल्या वक्तव्यांमुळे तरुणांमध्ये नाराजी पसरली आहे. हाके यांनी मराठा आरक्षणाला विरोध दर्शवत ओबीसी समाजाच्या हक्कांचे रक्षण करण्याची भूमिका घेतली आहे, ज्यामुळे दोन समाजांमध्ये तणाव वाढला आहे. या घटनेमुळे नीरा परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरुणांवर कारवाईचा इशारा दिला आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईतील आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला असून, मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावे, अशी मागणी केली आहे. हा वाद पुढे काय वळण घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अजित पवार सर्व कार्यक्रम रद्द करून मुंबईला, पडद्यामागच्या हालचाली वाढल्या



उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत होणारे उरुळी कांचन ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे उद्घाटन अखेर फक्त शरद पवार यांच्या हस्तेच झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी आज मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या जागी आमदार माऊली कटके कार्यक्रमाला उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने उरुळी ग्रामपंचायतीचे कामकाज साकारण्यात आले आहे, त्यामुळे त्यांनी उपस्थित राहावे अशी गावकऱ्यांची अपेक्षा होती. तसेच, नवीन महानगरपालिका उभारण्याच्या प्रक्रियेत उरुळी कांचनचा समावेश होणार आहे. गावासाठी अनेक प्रस्ताव अजित पवार यांनी केले आहेत. यापूर्वी उरुळी कांचनमधील शाळा, रस्ते आणि इतर विकासकामे शरद पवार यांच्या हस्तेच झालेली आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी या कार्यालयाचे उद्घाटन शरद पवार आणि अजित पवार यांच्या संयुक्त हस्ते व्हावे, अशी मागणी केली होती. परंतु गेल्या अनेक कार्यक्रमांत अजित पवार, शरद पवारांसोबत मंचावर येणं टाळत असल्याचे चित्र दिसून आले आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्येही शरद पवारांच्या शेजारी बसणं अजित पवार टाळत असल्याचे उदाहरण पाहायला मिळाले आहे. त्यामुळे दोघे एकत्र आल्यावर नेहमीच राजकीय चर्चांना उधाण येते.

## तुम्ही सर्वांनी सावध राहा! सुप्रिया सुळेंना घेराव घालणाऱ्यांबाबत जरांगेंचं वक्तव्य

# ...तर तुमच्याकडे कोणी येणार नाही!

### नेत्यांना सन्मानाने वागवण्यास सांगितलं

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाची मागणी घेऊन मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांची भेट घेण्यासाठी अनेक नेते आंदोलनस्थळाला भेट देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील आज आझाद मैदानात जाऊन मनोज जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.**



मात्र, तिथून निघताना काही आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांच्या कारला घेराव घातला. तसेच त्यांच्या कारवर पाण्याच्या बाटल्या फेकल्या. यावर मनोज जरांगे पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. त्यांनी सर्व आंदोलकांना आवाहन केलं की इथे येणाऱ्या प्रत्येक नेत्याला सन्मानाने वागवा. मनोज जरांगे पाटील म्हणाले, "आपल्या आंदोलनाच्या ठिकाणी वेगवेगळे नेते येतील. तो नेता कुठल्याही पक्षाचा असो, भाजपाचा असो, विरोधी पक्षाचा असला तरी त्याला आपल्या पोरांनी त्रास देऊ नये. आपल्या व्यासपीठावर आलेला आपला शत्रू असला तरी त्याला सन्मान द्यायला शिका. अन्यथा नेथे इथे यायला घाबरतील. मला आत्ता पत्रकारांनी सांगितलं की काही लोकांनी मघाशी इथे गोंधळ घातला. हे बरं नाही."मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे म्हणाले, अरे पोरांनो, नेते आल्यावर तुम्ही गोंधळ घातला तर तुमच्याकडे कोणी येणार नाही. इथे कोणीही येऊ द्या, भाजपाचा नेता किंवा आणखी कुठल्या पक्षाचा नेता, शिवसेनेचा, राष्ट्रवादीचा किंवा इतर पक्षाचा नेता इथे आल्यावर त्याला सन्मानाने वागवा. आपल्याला सहन होतंय तोवर त्यांचा सन्मान करायचा. परंतु, जेव्हा आपल्याला वाटेल की आरक्षण मिळत नाही तेव्हा बघू काय करायचं. परंतु, सध्या कुठल्याही पक्षाचा नेता इथे आला तरी उलट बोलू नका. आता सगळी जबाबदारी तुमच्यावर आहे."मनोज जरांगे पाटील म्हणाले, "गोंधळ घालणारे कोण आहेत ते बघा. त्या घटनेचे व्हिडीओ असतील, ते बघा. गोंधळ घालणारे सरकारने पाठवलेले लोक आहेत का ते बघायला हवं. सरकार दंगल घडवू शकतं. कारण माझी पोरं असं काही करत नाहीत. गोंधळ घालणारे सरकारचेच लोक असू शकतात. त्यामुळेच ते असं वागले. त्यामुळे तुम्ही सर्वांनी सावध राहा. तुर्तास इथे येणाऱ्या कुठल्याही नेत्याला त्रास देऊ नका. बाकी मी सगळं बघतो. मी सगळ्यांना पुरून उरणारा आहे.मात्र, तिथून निघताना काही आंदोलकांनी

### कुठल्याही नेत्याला त्रास देऊ नका

गोंधळ घालणारे सरकारने पाठवलेले लोक आहेत का ते बघायला हवं. सरकार दंगल घडवू शकतं. कारण माझी पोरं असं काही करत नाहीत. गोंधळ घालणारे सरकारचेच लोक असू शकतात. त्यामुळेच ते असं वागले. त्यामुळे तुम्ही सर्वांनी सावध राहा. तुर्तास इथे येणाऱ्या कुठल्याही नेत्याला त्रास देऊ नका. बाकी मी सगळं बघतो. मी सगळ्यांना पुरून उरणारा आहे.

सुप्रिया सुळे यांच्या कारला घेराव घातला. तसेच त्यांच्या कारवर पाण्याच्या बाटल्या फेकल्या. यावर मनोज जरांगे पाटील यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. त्यांनी सर्व आंदोलकांना आवाहन केलं की इथे येणाऱ्या प्रत्येक नेत्याला सन्मानाने वागवा. मनोज जरांगे पाटील म्हणाले, "आपल्या आंदोलनाच्या ठिकाणी वेगवेगळे नेते येतील. तो नेता कुठल्याही पक्षाचा असो, भाजपाचा असो, विरोधी पक्षाचा असला तरी त्याला आपल्या पोरांनी त्रास देऊ नये. आपल्या व्यासपीठावर आलेला आपला शत्रू असला तरी त्याला सन्मान द्यायला शिका. अन्यथा नेथे इथे यायला घाबरतील. मला आत्ता पत्रकारांनी सांगितलं की काही लोकांनी मघाशी इथे गोंधळ घातला. हे बरं नाही."मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे म्हणाले, अरे पोरांनो, नेते आल्यावर तुम्ही गोंधळ घातला तर तुमच्याकडे कोणी येणार नाही. इथे कोणीही येऊ द्या, भाजपाचा नेता किंवा आणखी कुठल्या पक्षाचा नेता, शिवसेनेचा, राष्ट्रवादीचा किंवा इतर पक्षाचा नेता इथे आल्यावर त्याला सन्मानाने वागवा. आपल्याला सहन होतंय तोवर त्यांचा सन्मान करायचा. परंतु, जेव्हा आपल्याला वाटेल की आरक्षण मिळत नाही तेव्हा बघू काय करायचं. परंतु, सध्या कुठल्याही पक्षाचा नेता इथे आला तरी उलट बोलू नका. आता सगळी जबाबदारी तुमच्यावर आहे."मनोज जरांगे पाटील म्हणाले, "गोंधळ घालणारे कोण आहेत ते बघा. त्या घटनेचे व्हिडीओ असतील, ते बघा.

# सिंहगड रस्ता उड्डाणपुलाला अखेर मुहूर्त!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन

**सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या लोकार्पणाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. या उड्डाणपुलाचे रखडलेले उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी (१ सप्टेंबर) होणार आहे. त्यानंतर तातडीने उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.**



केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राजाराम पूल ते फनटाइम चित्रपटगृह या दरम्यान उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. यापूर्वी सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फन टाइम चित्रपटगृह दरम्यान राजाराम पूल चौकातील ५२० मीटर लांबीचा उड्डाणपूल आणि विठ्ठलवाडी कमान ते फन टाइम चित्रपटगृह हा २ हजार १२० मीटर लांबीचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी यापूर्वीच खुला करण्यात आला आहे.तर, तिसऱ्या टप्प्यातील

### सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची उपस्थित

या परिस्थितीत ११८ कोटींचा सिंहगड रस्ता उड्डाणपूल प्रकल्प हा पुणे शहरातील एक महत्त्वाकांक्षी आणि तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक प्रकल्प पूर्ण व्हावा म्हणून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला होणार असल्याने प्रवास जलदगतीने आणि सुकर होईल माधुरी मिसाळ यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

गोयल गंगा चौक ते इनामदार चौक हा १ हजार ५४० मीटर लांबीचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नव्हता.मात्र कामे होऊनही उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केला जात नसल्याचा दावा करून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर कामे वेगाने पूर्ण करण्यात आली आणि उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा निर्णय घेण्यात आला.सिंहगड रस्ता, धायरी, नऱ्हे, खडकवासला, मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता सिंहगड रस्ता परिसरात सकाळ-संध्याकाळ वाहतुकीचा ताण प्रचंड असतो.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# पिंपरी चिंचवडमध्ये नऊ ठिकाणी आवास योजना!

## पंतप्रधान आवास योजनेचा दुसरा टप्पा; साडेसहा हजार कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात दुसऱ्या टप्प्यात नऊ ठिकाणी पंतप्रधान आवास योजना राबविली जाणार आहे. या योजनेत साडेसहा हजार सदनिका बांधण्यात येणार आहेत. सदनिकेचे क्षेत्रफळ वाढवण्यात आले असून उत्पन्न मर्यादेतही वाढ केली आहे. शहरातील साडेसहा हजार कुटुंबांना पक्के व हक्काचे घर मिळणार आहे.**



महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत मोशीतील बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, पिंपरीतील उद्यमनगर, आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारला आहे. तेथे तीन हजार 668 सदनिका आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना देण्यात आल्या आहेत. तर डुडुळगाव येथील एक हजार 190 सदनिका गृहप्रकल्पांच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. न्यायालयीन प्रक्रियेमुळे रावेत येथील 934 सदनिकांचा गृहप्रकल्प रद्द करण्यात आला आहे. तेथील लाभार्थ्यांना किवळे येथे सदनिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे. रावेत गृहप्रकल्पाचा पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समावेश करण्यात आला आहे. मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी, ताथवडे, रावेत येथे दोन आणि चोविसावाडी असे एकूण नऊ ठिकाणी महापालिकेच्या वतीने दुसऱ्या टप्प्यात आवास योजना राबविण्यात येणार आहे. त्यांपैकी मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी व रावेत या सहा ठिकाणी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सदनिका असणार आहेत, तर रावेत, ताथवडे, चोविसावाडी या ठिकाणी बेघरांसाठी घरे (एचडीएच गट) गृहप्रकल्प आहे. महापालिकेने सुधारित विकास योजना आराखड्यात (डीपी) या ठिकाणच्या जागा आरक्षित केल्या आहेत.

> आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये नऊ ठिकाणी गृहप्रकल्प राबविण्यात येणार आहे. वाढवलेली उत्पन्न मर्यादा, घराच्या किमान कार्पेट क्षेत्रफळामध्ये वाढ व झोपडपट्टीवासीयांचा समावेशामुळे शहरातील हजारो नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येईल. गृह प्रकल्पासाठी जागा ताब्यात घेऊन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत नगर रचना विभागास सूचित करण्यात आले. जागा ताब्यात आल्यानंतर केंद्र व राज्य शासनाची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानंतर इमारत उभारणीचे काम सुरू केले जाईल.
> **-संजय कुलकर्णी,** मुख्य अभियंता, महापालिका

आवास योजनेत दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील आर्थिक दुर्बल घटकासाठी पूर्वी तीन लाख रुपये उत्पन्नाची मर्यादा होती. तीन लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या नागरिकांनाच लाभ मिळत होता होता. आता उत्पादनाची मर्यादा वाढवून सहा लाख रुपये करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात लाभार्थ्यांना 30 चौरस मीटर (323 चौरस फूट) चटई क्षेत्राची सदनिका देण्यात येत होती. मात्र, टप्पा दोनअंतर्गत आता 45 चौरस मीटर (484 चौरस फूट) क्षेत्रफळाच्या सदनिका मिळणार आहेत.

---

# महापालिका निवडणुकीसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

## प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्राच्या निश्चितीसाठी नोडल अधिकारी

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड |प्रतिनिधी: पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर केल्यानंतर पालिकेचा निवडणूक विभाग कामाला लागला आहे. मतदान केंद्राच्या निश्चितीसाठी क्षेत्रीय अधिका-यांची नियुक्तीनंतर प्राधिकृत अधिकारी, नोडल अधिकारी, सहायक नोडल अधिका-यांची नियुक्ती केली आहे. याबाबत निवडणूक अधिकारी तथा आयुक्त शेखर सिंह यांनी आदेश जारी केला आहे.**




महापालिका निवडणुकीसाठी 22 ऑगस्ट रोजी प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे प्रसिध्द करून हरकती आणि सुचना मागविण्यात आल्या आहेत. निवडणूक विभागाने यापूर्वी मतदान केंद्राच्या निश्चितीसाठी क्षेत्रीय अधिका-यांची नियुक्ती केली आहे. त्यानंतर आता निवडणूक व्यवस्थापन, मतदान केंद्रांची व्यवस्था, कर्मचारी नियुक्ती, कायदा व सुव्यवस्था राखणे, साहित्य वितरण, आयटी व्यवस्थापन, मीडिया व प्रचार नियंत्रण, तसेच तक्रार निवारण आदी क्षेत्रांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. निवडणुकीदरम्यान आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी, यासाठी नोडल अधिकारी कार्यरत राहणार आहेत. या नोडल अधिका-यांच्या नियुक्तीमुळे समन्वय वाढून निवडणुकीचे कामकाज सुलभ होणार असल्याचा दावा निवडणूक अधिकारी सिंह यांनी केला आहे.

निवडणूक अधिकारी यांचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता महेश बरीदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात प्राधिकृत अधिकारी म्हणून उप आयुक्त संदीप खोत, सहायक आयुक्त मुकेश कोळप, नियुक्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी सह आयुक्त मनोज लोणकर, मतदार यादीचे व्यवस्थापन करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, आचार संहिता व्यवस्थापन कामकाजासाठी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांची नियुक्ती केली आहे. तसेच मतदान केंद्र, स्थापत्य व विद्युत व्यवस्था शहर अभियंता मकरंद निकम, ईव्हीएम व वितरण व्यवस्था मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, वाहतूक व्यवस्था सह शहर अभियंता अनिल भालसाकले, मतमोजणी व स्ट्रॉंग रुम व्यवस्थापन तसेच निवडणूक निरीक्षक व्यवस्थापन यासाठी मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, जनसंपर्क व प्रसिद्धी कक्ष तसेच स्वीप व्यवस्थापन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, निवडणूक खर्च व्यवस्थापनासाठी मुख्य लेखापरिक्षक प्रमोद भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कर्मचारी मानधन व मुशहिरा वाटप कक्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, निवडणूक साहित्य व स्टेशनरी व्यवस्थापन उप आयुक्त निलेश भदाणे, टपाली मतपत्रिका उप आयुक्त सचिन पवार, मतपत्रिका छपाई मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, विविध परवाना एक खिडकी योजना कक्ष व न्याय विधी कक्ष उप आयुक्त राजेश आगळे, कम्युनिकेशन प्लॅन उपसंचालक किशोर गोखले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदार मदत केंद्र तक्रार निवारण कक्ष व नियंत्रण कक्ष व कॉलसेंटर सहायक आयुक्त उमेश ढाकणे, दिव्यांग मतदार कक्ष, कर्मचारी कल्याण कक्ष उपआयुक्त ममता शिंदे, प्राथमिक आरोग्य सुविधा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, संगणकीय कामकाज कक्ष मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, बैठक नियोजन इतिवृत्त कक्ष उप आयुक्त प्रदीप ठेंगल व दूरसंचार सुविधा कक्ष सह शहर अभियंता माणिक चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




**भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत.**

# गणेशोत्सव : 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास

लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.सन 1893 साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक



व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या,समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले.पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला. महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव नागपूर, अकोला,अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षांची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात.सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते. पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते.देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फेस्टिवल, उत्सव,कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात. पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात. मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरु झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगताने देखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे.मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील या काळात बाप्पा विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पध्दतीने साजरा केला जातो.

## प्रासंगिक »

### भाजप नाते !

***राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजप आणि परिवाराची मातृसंस्था असल्याचे सांगितले जात असले, तरी संघ मात्र त्याचा वारंवार इन्कार करतो.***

संघाच्या दारी भाजप आणि परिवारातील नेते वारंवार हजेरी लावतात. भाजपही कोणतीही महत्त्वाची पदे देताना संघाचा स्वयंसेवक ही पात्रता महत्त्वाची मानतो. असे असताना सरसंघचालक मोहन भागवत अलिकडे वारंवार कोणत्याही संघटनेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर नसल्याचे सांगतात. संघाच्या शताब्दी वर्षात भागवत यांनी यांच्या दिल्लीच्या भाषणातून त्यांनी सर्वव्यापकता दाखवून देताना भाजपशी दोन हात दूर असल्याचे संकेत दिले. हिंदू राष्ट्र' म्हणजे कोणताही प्रदेश किंवा राजकीय सत्ता नाही. याचा अर्थ भेदभाव न करता सर्वांना न्याय मिळवून देणे असा आहे. मग तो कोणताही धर्म असो, भाषा असो किंवा विचारसरणी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'संघाचा शंभर वर्षांचा प्रवास: नवीन क्षितीज' या शताब्दी व्याख्यानमालेच्या उद्घाटनादरम्यान सरसंघचालक मोहन भागवत यांनी हा सूर लावला.

संघर्ष अशा चढउतारांनी या दोन मोठ्या अर्थव्यवस्थांच्या संबंधांच्या इतिहासाची पाने भरलेली आहेत; पण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा संरक्षणवादी धोरणाचा अवलंब करत भारतीय निर्यातीवर दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्याने आता या संबंधांमध्ये कटुतेचे एक नवे पर्व सुरू झाल्याचे दिसत आहे.

# टॅरिफचे आव्हान आणि भारत

५० टक्के टॅरिफ आकारणीमुळे भारतासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. ट्रम्प यांचा दावा आहे की, अमेरिकन बाजारपेठेत स्वस्त दराने घुसणाऱ्या विदेशी वस्तूंमुळे स्थानिक रोजगार आणि उद्योग धोक्यात आले आहेत. त्यामुळे आयातीवर कठोर टॅरिफ लावून रोजगार वाचवणे आणि स्थानिक उत्पादनास चालना देणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. या निर्णयाचा फटका भारताला बसणार आहे, हे वास्तव दुर्लक्षिता येणार नाही. भारतातून अमेरिकेला जाणारी निर्यात मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषतः रेडिमेड वस्त्रे, ॲपरेल्स, पादत्राणे, औषधनिर्मिती, कृषी उत्पादनं, समुद्री अन्नपदार्थ, रसायने, मशिनरी आणि ऑटो पार्टस् या क्षेत्रांवर सर्वाधिक अवलंबित्व आहे. टैरिफमुळे या सर्व क्षेत्रांना मोठा धक्का बसणार आहे. सरकारी आकडेवारीनुसार जवळपास ४८ अब्ज डॉलर्सच्या भारतीय निर्यातीवर हा परिणाम होईल. वस्त्रोद्योग आणि पादत्राणे यांसारख्या रोजगारकेंद्रित क्षेत्रांवर त्याचा सर्वाधिक आघात होणार असून सुमारे ७ लाख




लोकांच्या नोकऱ्यांना थेट धोका निर्माण होईल. राजस्थानासारख्या राज्यांत तर याचा परिणाम अधिक गंभीर स्वरूपात दिसेल. तेथील कापड आणि वस्त्रोद्योग, रत्नजडित दागिन्यांचा व्यापार, हडिक्राफ्टस् व औषध उद्योग हे सर्वाधिक निर्याताभिमुख आहेत. एका अंदाजानुसार फक्त राजस्थानच्या १८ हजार कोटी रुपयांच्या

टैरिफ आकारणीमुळे भारत-अमेरिका संबंध नव्या वळणावर पोहोचले आहेत. त्यांचे भवितव्य काय असेल, यापेक्षाही या निर्णयामुळे होणाऱ्या परिणामांचा विचार अधिक महत्त्वाचा आहे. टॅरिफमुळे ४८ अब्ज डॉलरच्या निर्यातीला तडाखा बसेल. यामध्ये रेडिमेड कपड्यांवर ६१ टक्के टॅरिफ आकारणी केली जाणार असल्याने १०.८ अब्ज डॉलरची वस्त्रोद्योगाची निर्यात प्रभावित होणार आहे.निर्यातीवर संकट ओढवणार आहे. यामुळे सुमारे ६, २०० कोटी रुपयांचा वस्त्रोद्योग, ५००० कोटी रुपयांचे रत्नजडित दागिने, ६००० कोटी रुपयांचे हॅंडिक्राफ्टस् आणि २५०० कोटी रुपयांचे औषध क्षेत्र प्रभावित होईल. यातील अनेक उद्योग ग्रामीण व अर्धशहरी भागांत चालतात. त्यामुळे हजारो कारागीर, लघुउद्योग व कुटुंबे थेट बेरोजगारीच्या संकटात सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेच्या या नव्या धोरणामुळे विविध क्षेत्रांवरील कर दर प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. कृषी उत्पादनांवर आणि मसाल्यांवर ५० टक्क्यांपर्यंत, ऑटो पार्टस्वर ५२ टक्क्यांपर्यंत, फुटवेअरवर ५२ टक्क्यपिक्षा अधिक, मशिनरीवर ५१ टक्के, फर्निचरवर ५२ टक्के, रसायनांवर ५३ टक्के आणि कपडे व वस्त्रांवर सुमारे ६१ टक्के शुल्क वाढवले आहे. या वाढलेल्या शुल्काचा परिणाम आकडेवारीत मांडला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**मराठा आरक्षण** राज ठाकरेंच्या वक्तव्यावर एकनाथ शिंदेंचा पलटवार

# आंदोलक पुन्हा मुंबईला का आले?

## सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केलं आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण आंदोलन सुरू असून आज (३१ ऑगस्ट) आंदोलनाचा तिसरा दिवस आहे. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झालेले आहेत.**

दरम्यान, हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाल्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. “मराठा आंदोलक पुन्हा मुंबईला का आले? हे एकनाथ शिंदेंना विचारा. सर्व प्रश्नांची उत्तरं तेच देतील”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या वक्तव्याला आता एकनाथ शिंदे यांनी उत्तर देत राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी होती, असं म्हटलं आहे.राज ठाकरे यांच्या विधानाला प्रत्युत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, “राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी होती. खरं म्हणजे आरक्षण कोणामुळे गेलं? त्यांना राज ठाकरेंनी प्रश्न विचारायला पाहिजे होते. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दिलेलं आरक्षण आम्ही उच्च न्यायालयात टिकवलं होतं. मात्र, तुम्हाला ते आरक्षण का टिकवता आलं नाही? असा प्रश्न तत्कालीन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सरकारला राज ठाकरेंनी विचारायला हवा होता”, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आता मी जे काही बोलत आहे ते काही लोकांना माहिती व्हावं की, १० टक्के आरक्षण आम्ही दिलं, कुणबी प्रमाणपत्र शिंदे समिती स्थापन करून अनेक पुरावे शोधून त्यामध्ये कुणबी नोंदी शोधल्या. त्याचा लाभ मोठ्या प्रमाणात मराठा समाजाला झाला. खरं म्हणजे आरक्षण कोणामुळे गेलं? त्यांनाच राज ठाकरेंनी प्रश्न विचारायला पाहिजे होते”, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी राज ठाकरे यांच्यावर पलटवार केला.मराठा विरुद्ध ओबीसी या आरक्षणावरील वादाकडे कसं पाहता? असं विचारल्यावर राज ठाकरे म्हणाले होते, “मी याचं उत्तर देऊ शकणार नाही. एकनाथ शिंदे तुमच्यासमोर येतील तेव्हा तुम्ही हे त्यांनाच विचारा. आरक्षणाबाबतची माझी भूमिका सर्वांना माहिती आहे. ते सगळं आता जुनं झालं. मात्र, सध्याच्या घटनांवर केवळ एकनाथ शिंदे हेच बोलू शकतात.” “मुंबईतील वाहतूक कोंडी, तुम्ही (माध्यम) म्हणताय तसा लोकांना त्रास होतोय वगैरे गोष्टींवर शिंदे बोलू शकतात. कारण मागच्या वेळेस एकनाथ शिंदे हेच नवी मुंबईला गेले होते ना? त्यांनी नवी मुंबईत जाऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवला असं सांगितलं जात होतं. मग मराठा आंदोलक परत का आले या सर्व गोष्टींची उत्तरं केवळ एकनाथ शिंदे देऊ शकतात”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं.दरम्यान, हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाल्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. “मराठा आंदोलक पुन्हा मुंबईला का आले? हे एकनाथ शिंदेंना विचारा. सर्व प्रश्नांची उत्तरं तेच देतील”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या वक्तव्याला आता एकनाथ शिंदे यांनी उत्तर देत राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी होती, असं म्हटलं आहे.राज ठाकरे यांच्या विधानाला प्रत्युत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, “राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी होती. खरं म्हणजे आरक्षण कोणामुळे गेलं? त्यांना राज ठाकरेंनी प्रश्न विचारायला पाहिजे होते.

### १० टक्के आरक्षण आम्ही दिलं

देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दिलेलं आरक्षण आम्ही उच्च न्यायालयात टिकवलं होतं. मात्र, तुम्हाला ते आरक्षण का टिकवता आलं नाही? असा प्रश्न तत्कालीन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सरकारला राज ठाकरेंनी विचारायला हवा होताकाही लोकांना माहिती व्हावं की, १० टक्के आरक्षण आम्ही दिलं. कुणबी प्रमाणपत्र शिंदे समिती स्थापन करून अनेक पुरावे शोधून त्यामध्ये कुणबी नोंदी शोधल्या.

# जरांगेंच्या आंदोलनावर तोडगा काय?

## सरकार आरक्षण प्रश्नावर कायदेशीर मार्गाने तोडगा काढेल



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटला आहे. मनोज जरांगे पाटील हे त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांसह मुंबईत दाखल झाले असून बेमुदत उपोषणाला बसले आहेत. आज (३१) त्यांच्या उपोषणाचा तिसरा दिवस आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे.**

तर, विरोधी पक्षातील नेते राज्य सरकारने मराठा आरक्षणावर तातडीने तोडगा काढावा अशी मागणी करत आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर महत्त्वाची टिप्पणी केली आहे. ते म्हणाले, “आम्ही चर्चेतून मार्ग काढण्याचा आणि कायदेशीर मार्गाने आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत.”देवेंद्र फडणवीस म्हणाले, “मनोज जरांगे ज्या काही मागण्या करत आहेत त्याकडे आमचं सरकार सकारात्मकतेने पाहात आहे. कुठलीही मागणी मान्य करायची असेल तर ती कायद्याच्या चौकटीत बसली पाहिजे. मराठ्यांचा सरसकट ओबीसीत समावेश करा ही त्यांची मागणी आहे. परंतु, त्यासमोर सामाजिक संतुलनाचा मोठा प्रश्न आहे. त्यासाठी आपल्याला न्यायालयासमोर उभं राहावं लागू शकतं. म्हणूनच कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन असा निर्णय घेतला तर तो टिकणार नाही. आपण लोकांना खुश करायला असा निर्णय घेऊ शकतो. परंतु, तो निर्णय टिकणार नाही.”मुख्यमंत्री म्हणाले, “मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारने नेमलेली राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील उपसमिती चर्चा करत आहे.

### आडमुठ्या भूमिकेतून तोडगा नाही

न्यायालयाने दिलेल्या निर्णयांची पडताळणी करत आहोत आणि या सगळ्या प्रश्नांवर मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहोत.” देवेंद्र फडणवीस टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आलं की या सगळ्यावर काय तोडगा निघणार? यावर ते म्हणाले, “चर्चेतून मार्ग निघेल. मात्र, आडमुठ्या भूमिकेतून तोडगा निघणार नाही.


## सुधारणा गवई यांचा उल्लेख करत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची प्रतिक्रिया

# भटक्या कुत्र्यांचा मी आभारी आहे

### प्राणीप्रेमी आशीर्वाद देत आहेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आपल्या चौकस विनोदबुद्धीने कायदेशीर बाबींवर निखळ प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या न्यायाधीश विक्रम नाथ यांनी शनिवारी देशभरात गाजलेल्या भटक्या कुत्र्यांबाबतच्या प्रकरणावर भाष्य केले. भटक्या कुत्र्यांमुळे मला जगभरात प्रसिद्धी मिळाली, असे विधान त्यानी केले. केरळमधील तिरुअनंतपुरम येथे आयोजित केलेल्या 'मानव-वन्यजीव संघर्षा'वरील प्रादेशिक परिषदेत बोलत असताना शनिवारी त्यांनी हे विधान केले.**



न्यायाधीश विक्रम नाथ म्हणाले, मी आतापर्यंत कायद्याच्या क्षेत्रात माझे छोटेसे योगदान दिले होते. मात्र भटक्या कुत्र्यांच्या प्रकरणामुळे मला देशातच नाही तर जगभरातील संपूर्ण नागरी समाजाला ओळख मिळाली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.२२ ऑगस्ट रोजी न्यायाधीश विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या विशेष खंडपीठाने न्यायाधीश जेबी पारडीवाला यांच्या अध्यक्षतेखाली दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशात सुधारणा केली होती. ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर समाजातील विविध घटकांनी टीका केली होती. भटक्या कुत्र्यांबाबत न्यायालय कठोर आदेश देत असल्याचे म्हटले गेले.न्यायाधीश विक्रम नाथ म्हणाले की, मी सरन्यायाधीश बीआर गवई यांचा आभारी आहे की, त्यांनी हे प्रकरण मला सोपविले. आपल्या भाषणात विनोदात ते म्हणाले, "मला फक्त प्राणीप्रेमीच नाही तर भटके कुत्रेही आशीर्वाद आणि शुभेच्छा देत आहेत." न्या. नाथ पुढे म्हणाले, नुकतेच आम्ही लॉ एशिया पोला समिटसाठी गेलो होतो. तिथे मला भटक्या कुत्र्यांच्या प्रकरणावर प्रश्न विचारण्यात आले. मला आनंद झाला की, भारताबाहेरील लोकांनाही या प्रकरणात रस होता. मला सन्मान दिल्याबद्दल मी आभारी आहे.केरळमधील झालेल्या 'मानव-वन्यजीव संघर्षा'वरील प्रादेशिक परिषदेसाठी न्या. नाथ यांच्यासह सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश सूर्यकांत, न्या. बीव्ही नागरत्न आणि न्या. एम. एम. सुंदरेशही उपस्थित होते. ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात म्हटले होते की, दिल्लीतील हजारो भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर होम उभारून त्यांना तिथे ठेवण्यात यावे. एकदा शेल्टरमध्ये हलवल्यानंतर कोणत्याही भटक्या कुत्र्याला पुन्हा रस्त्यावर सोडले जाऊ नये. इतकेच नाही तर जर कोणी व्यक्ती किंवा संस्था भटक्या कुत्र्यांना पकडण्याच्या कारवाईदरम्यान कोणी अडथळा आणत असेल तर त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल, असेही न्यायालयाने म्हटले होते.११ ऑगस्टच्या आदेशावर टीका झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने यात सुधारणा केली. न्या. विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने म्हटले की, भटक्या कुत्र्यांची नसबंदी केल्यानंतर त्यांचे लसीकरण करण्यात यावे आणि त्यांना पुन्हा जिथून पकडले त्याच अधिवासात सोडण्यात यावे. तसेच जे कुत्रे रेबीज संक्रमित आहेत, त्यांना मात्र सोडू नये, न्यायालयाने स्पष्ट केले. न्या. नाथ यांच्या खंडपीठाने भटक्या कुत्र्यांच्याबाबतीत एक राष्ट्रीय आराखडा तयार करण्यात यावा, असेही म्हटले. तसेच यावर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आपले म्हणणे मांडण्यासाठी ते..२२ ऑगस्ट रोजी न्यायाधीश विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या विशेष खंडपीठाने न्यायाधीश जेबी पारडीवाला यांच्या अध्यक्षतेखाली दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशात सुधारणा केली होती. ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर समाजातील विविध घटकांनी टीका केली.

### लोकांनाही या प्रकरणात रस होता

भटक्या कुत्र्यांबाबत न्यायालय कठोर आदेश देत असल्याचे म्हटले गेले.न्यायाधीश विक्रम नाथ म्हणाले की, मी सरन्यायाधीश बीआर गवई यांचा आभारी आहे की, त्यांनी हे प्रकरण मला सोपविले. आपल्या भाषणात विनोदात ते म्हणाले, "मला फक्त प्राणीप्रेमीच नाही तर भटके कुत्रेही आशीर्वाद आणि शुभेच्छा देत आहेत. मला आनंद झाला की, भारताबाहेरील लोकांनाही या प्रकरणात रस होता.

## आमचे ग्राहक अतिरिक्त टॅरिफसाठी तयार

# भारतीय CEOची थेट ट्रम्प यांना उद्देशून केलेली पोस्ट चर्चेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेले ५० टक्के टॅरिफ लागू झाल्यानंतर भारतातील रेडिमेड कपड्यांच्या उद्योगांना मोठा फटका बसला आहे. भारतात सणासुदीचे दिवस सुरू होत असणाताच हे हे टॅरिफ लागू झाले आहेत. याचा त्रिरुपूर, नोएडा, लुधियाना आणि इतर ठिकाणच्या टेक्सटाइल क्लस्टर्सना धक्का बसला आहे, कारण येथूनच अमेरिकेतील जागतिक ब्रँड्सना निर्यातदार SEQUINED टॉप्सपासून पोलो शर्ट्स, रिसॉर्ट वेअर आणि कफ्तानपर्यंत सर्व काही पुरवतात.**



ट्रम्प यांच्या टॅरिफचे परिणाम भारतीय कापड उद्योगांवर स्पष्टपणे दिसून येत आहेत. अनेक खरेदीदारांनी त्यांच्या नव्या ऑर्डर थांबवल्या आहेत. तर काही खरेदीदारांचे म्हणणे आहे की वाढलेल्या शुल्काचा काहीसा भार हा निर्यातदारांनी उचलावा. मात्र उत्पादन खर्च वाढल्याने नफा आधीच कमी झाला आहे, यामुळे अनेक लहान आणि मध्यम आकाराचे उद्योग हे अडचणीत सापडले आहेत. बाजारात गोंधळाची स्थिती असूनदेखील एक निर्यातदार मात्र यापासून वेगळी स्थिती सांगताना दिसत आहेत. टीस्ट्रा (TEESTRA) लाइफस्टाइलचे संस्थापक आणि सीईओ वसंत मारीमुथु यांचा अमेरिकेतील व्यवसाय कोणत्याही अडचणीशिवाय सुरू आहे. कस्टम टी-शर्ट्स आणि लहान बॅचमध्ये कपडे बनवणाऱ्या त्यांच्या या कंपनीला टॅरिफच्या वाढीचा काहीही फरक पडला नसल्याचे पाहायला मिळत आहे. मारिमुथु यांनी सोशल मीडियावर थेट अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना उद्देशून पोस्ट केली आहे. यामध्ये ते म्हणाले की, "हॅलो मिस्टर ट्रम्प – आम्ही अमेरिकेसाठीच्या पुढील सॅम्पल शिपमेंटसाठी तयार आहोत.

### अब्जावधींच्या निर्यातीवर संकट

अमेरिकेतील आमचे ग्राहक अतिरिक्त शुल्कासाठी तयार आहेत. आमच्या मालामध्ये अशा प्रकारचं मुल्य आम्ही घेऊन येतो. आपण या विषयाकडे लक्ष दिल्याबद्दल आभार."भारत हा जागतीक स्तरावर सहाव्या क्रमांकाचा सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहे. ज्यामध्ये आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ३४.४ अब्ज डॉलर्स किमतीचा माल निर्यात करण्यात आला आहे.

# गणपतीच्या 4 हातांची 4 रहस्ये!

**भगवान गणेशाला दोन हात असले तरी त्याच्या विशेष अवताराच्या वेळी त्याला चार हात असल्याचे वर्णन केले आहे. त्याच्या चार हातांच्या चार हातांमध्ये चार वस्तू आहेत. त्याच्या चार हातांपैकी एका हातात अंकुश, दुसऱ्या हातात फंदा, तिसऱ्या हातात मोदक आणि चौथ्या हातात आशीर्वाद आहे. त्याच्या चार हातांचे रहस्य काय आहे ते जाणून घेऊया.**



## 1. पहिला हात :

बाप्पाच्या पहिल्या हातातील अंकुश हे सूचित करतो, की इच्छांवर संयम ठेवणे आवश्यक आहे.

## 2. दुसरा हात :

गणेश बाप्पाच्या दुसऱ्या हातातील लूप हे या वस्तुस्थितीचे सूचक आहे की प्रत्येक व्यक्तीने आपल्या आचरणात आणि वर्तनात इतका संयम आणि नियंत्रण असणे आवश्यक आहे, जेणेकरून जीवनाचा समतोल राखला जाईल. फंदा हे नियंत्रण, संयम आणि शिक्षेचे प्रतीक आहे.

## 3. तिसरा हात :

त्याच्या तिसऱ्या हातामध्ये मोदक आहे. मोदकाचा अर्थ आनंद देणारा (सुख देणारा) जो सुख आणि समाधान देतो. शरीर आणि मन समाधानी असणे महत्वाचे आहे, तरच तुम्हाला जीवनात खरा आनंद मिळेल. समाधान कसे मिळते? किंबहुना, जसे थोडे-थोडे-थोडे मोदक खाल्ल्याने त्याची चव आणि गोडवा अधिक आनंद मिळतो आणि शेवटी मोदक खाल्ल्यावर समाधान वाटते, त्याचप्रमाणे वरवरचे आणि बाह्य ज्ञानाने माणसाला आनंद मिळत नाही. तर ज्ञान मिळते. आनंद आणि यशाचा गोडवा त्याच्या खोलात दडलेला आहे.

## 4. चौथा हात:

या हाताने तो भक्तांना आशीर्वाद देतो. जो आपल्या कर्माचे फळ भगवंताच्या हाती देतो त्याला परमेश्वर आशीर्वाद देतो. हा चौथ्या हाताचा संदेश आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती व्हावी!

भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे. आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे होणे आवश्यक आहे. अगदी काही दिवसांवर येउन ठेपलेला गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाची काळजी घेऊन आपल्याला गणेशोत्सव साजरा करता येईल. भारतीय संस्कृतीमध्ये सण, उत्सव व परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. देशभरात विविध भौगोलिक प्रदेशानुसार सर्वत्र सण, उत्सव व परंपरा साजरे केले जातात. भारतीय सण, उत्सव व परंपरेला पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही महत्व आहे. यामाध्यमातून पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे हा ही संदेश दिला जातो. सणांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण हा ही प्रमुख हेतू असतो. निसर्गाला किंवा पर्यावरणाला अनुसरूनच सर्व धर्माचे सण, उत्सव व परंपरा आहेत. आजूबाजूच्या निसर्गसंपन्न वातावरणात सण साजरे केले जातात. सध्या गरज आहे सगळे सण हे निसर्गपूरक किंवा पर्यावरणपूरक कश्या पध्दतीने साजरे होतील हे पाहण्याची. त्यादृष्टीने जनजागृती होणे महत्वाचे आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला तर हा आनंद द्विगुणितच होईल. आनंददायी सोहळ्यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव कश्या पध्दतीने साजरा होईल हे पाहणे या निमित्ताने उचित ठरेल.आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा विचार करणे सुध्दा सध्या गरजेचे आहे. सध्या जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गचक्र बदलत आहे. मान्सून चक्र सुद्धा बदललेली आहे. महापूर, भूस्खलन यासारख्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येक सण हे पर्यावरणपूरक कशा पद्धतीने साजरा करता येईल हे पाहणे सध्याच्या काळामध्ये योग्य आहे. गणेशोत्सव साजरा करीत असताना जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेणे अपेक्षित आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा केला पाहिजे यावर प्रत्येकाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक बनलेले आहे. प्रत्येक सणानिमित्ताने घरामध्ये प्रसन्न वातावरण निर्माण होते. त्यामुळे व्यक्तीला, कुटुंबाला आणि समाजाला एक आत्मिक शांतता लाभते आणि आनंदही मिळतो. प्रसन्न वातावरणामुळे मनामध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे देशभरात साजरे करण्यात येणाऱ्या प्रत्येक सणाला विशेष महत्त्व आहे. सध्या संपूर्ण देशात गणेशोत्सवाचे मंगलमय वातावरण आहे. ढोल-ताशांच्या गजरामध्ये श्री गजाननाचे आगमन झालेले आहे. गौरीच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह, ऊर्जा, मराठी अस्मिता व परंपरा आणी भारतीय संस्कृतीचे प्रतीक असा सण आहे. सण साजरे करताना उत्सवातून प्रदूषण होणार नाही याची खबरदारी प्रत्येकाने घ्यायला हवी. सध्या सर्वत्र पर्यावरण ऱ्हासमुळे विविध प्रकारच्या समस्यांचा डोंगर उभा आहे. हवा, पाणी, ध्वनी आणि जमिनीचे प्रदूषण वाढतच आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणामध्ये आणखी भर नको. म्हणून इथून पुढच्या काळामध्ये प्रत्येक सण, उत्सव व परंपरा साजरे करताना पर्यावरण रक्षणांचा विचार करायला हवा. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण काय करू शकतो व आपण स्वतः पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी काय मदत करू शकतो. हेही प्रत्येकाने पाहिले पाहिजे. ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण कमी करण्यास हातभार लावू शकतो. गणेशोत्सव काळामध्ये मोठ्या प्रमाणात स्पीकर लावले जातात त्यामुळे ध्वनी प्रदूषण होते. त्यामुळे कमी आवाजात स्पिकर लावणे गरजेचे आहे. आतषबाजीमुळे फटाक्यातून हवा प्रदूषण होते. त्यामुळे फटाकेमुक्त गणेशोत्सव साजरा करणे गरजेचे आहे. गणपतीचे विसर्जन करताना नदीमध्ये किंवा तलावांमध्ये न करता मूर्तीदान करून पर्यावरण रक्षणासाठी मदत करू शकतो. गणेशोत्सवासाठी जंगलातील विविध प्रकारची पाने, फुले, फळे व वनस्पती यांचा वापर पूजा व सजावट करण्यासाठी केला जातो. त्यामुळे निसर्गातील दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून गणेशोत्सवात शेतामध्ये किंवा परस बागेमध्ये पिकवल्या जाणाऱ्या बागयती फुलांचा व फळांचा वापर करुन पर्यावरणपूरक सण साजरा करण्यास हातभार लावणे गरजेचे आहे.



मोदींचे पुजाराला पत्र

## पंतप्रधान मोदींचे चेतेश्वर पुजाराला निवृत्तीनंतर पत्र

# तू कसोटी क्रिकेटचे सौंदर्य जिवंत ठेवले!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचा माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराला पत्र लिहून त्याने त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत केलेल्या कामगिरीचे कौतुक केले आहे. पुजाराने गेल्या रविवारी १०३ कसोटी सामन्यांच्या त्याच्या दमदार कारकिर्दीला निरोप दिला. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पत्रात लिहिले आहे की, “हा काळ टी २० आणि एकदिवसीय क्रिकेटच्या वर्चस्वाचा काळ आहे आणि अशा काळात पुजाराच्या फलंदाजीने नेहमीच कसोटी क्रिकेटचे सौंदर्य जिवंत ठेवले. त्याच्या अढळ एकाग्रता आणि संयमाने त्याला भारतीय फलंदाजी एक मजबूत आधारस्तंभ बनवले.”**

## एकाच वर्षात संघाची साथ सोडली



पुजाराने हे पत्र सोशल मीडियावर शेअर केले आणि पंतप्रधानांच्या प्रेरणादायी शब्दांबद्दल त्यांचे आभार मानले. मोदींनी त्यांच्या संदेशात विशेषतः २०१८ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या ऐतिहासिक कसोटी मालिका विजयांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, “कठीण परिस्थितीतही पुजारा टीम इंडियाला भक्कमपणे उभा राहिला आणि आणि सर्वात आक्रमक गोलंदाजांविरोधात खंबीरपणे उभा राहिला.”पंतप्रधानांनी असेही लिहिले की, ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यांची चाहते नेहमीच आठवण ठेवतील, जिथे पुजाराने आपल्या आक्रमक फलंदाजीने भारताच्या ऐतिहासिक विजयाचा पाया रचला. मोदींनी पुजाराच्या देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीचेही कौतुक केले. ते म्हणाले की, “आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू असूनही, पुजाराने नेहमीच सौराष्ट्र आणि परदेशी लीगमध्ये प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणे पसंत केले. यावरून खेळाप्रती त्याची आवड आणि वचनबद्धता दिसून येते.”पंतप्रधान पुढे म्हणाले, “सौराष्ट्र क्रिकेटशी तुझा दीर्घकाळचा संबंध आणि राजकोटला क्रिकेटच्या नकाशावर आणण्यात तुझे योगदान या भागातील प्रत्येक तरुणासाठी अभिमानाचा विषय असेल.”पंतप्रधानांच्या या पत्राला उत्तर देताना पुजाराने म्हटले आहे की, “माझ्या निवृत्तीबद्दल आपल्या माननीय पंतप्रधानांकडून कौतुकाचे पत्र मिळाल्याने मला सन्मान वाटतो.

तुमच्या भावनांची मी खूप कदर करतो. माझ्या दुसऱ्या इनिंगमध्ये पाऊल ठेवताना, मैदानावर घालवलेल्या प्रत्येक आठवणी आणि मला मिळालेले प्रेम आणि कौतुक मी जपून ठेवेन. धन्यवाद सर.”पुजाराने हे

## पुजाराने कारकिर्दीला निरोप दिला

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचा माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराला पत्र लिहून त्याने त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत केलेल्या कामगिरीचे कौतुक केले आहे. पुजाराने गेल्या रविवारी १०३ कसोटी सामन्यांच्या त्याच्या दमदार कारकिर्दीला निरोप दिला. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पत्रात लिहिले आहे की, “हा काळ टी २० आणि एकदिवसीय क्रिकेटच्या वर्चस्वाचा काळ आहे.

पत्र सोशल मीडियावर शेअर केले आणि पंतप्रधानांच्या प्रेरणादायी शब्दांबद्दल त्यांचे आभार मानले. मोदींनी त्यांच्या संदेशात विशेषतः २०१८ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या ऐतिहासिक कसोटी मालिका विजयांचा उल्लेख केला.

ते म्हणाले की, “कठीण परिस्थितीतही पुजारा टीम इंडियाला भक्कमपणे उभा राहिला आणि आणि सर्वात आक्रमक गोलंदाजांविरोधात खंबीरपणे उभा राहिला.”पंतप्रधानांनी असेही लिहिले की, ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यांची चाहते नेहमीच आठवण ठेवतील, जिथे पुजाराने आपल्या आक्रमक फलंदाजीने भारताच्या ऐतिहासिक विजयाचा पाया रचला. मोदींनी पुजाराच्या देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीचेही कौतुक केले. ते म्हणाले की, “आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू असूनही, पुजाराने नेहमीच सौराष्ट्र आणि परदेशी लीगमध्ये प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणे पसंत केले.

यावरून खेळाप्रती त्याची आवड आणि वचनबद्धता दिसून येते.”पंतप्रधान पुढे म्हणाले, “सौराष्ट्र क्रिकेटशी तुझा दीर्घकाळचा संबंध आणि राजकोटला क्रिकेटच्या नकाशावर आणण्यात तुझे योगदान या भागातील प्रत्येक तरुणासाठी अभिमानाचा विषय असेल.”पंतप्रधानांच्या या पत्राला उत्तर देताना पुजाराने म्हटले आहे की, “माझ्या निवृत्तीबद्दल आपल्या माननीय पंतप्रधानांकडून कौतुकाचे पत्र मिळाल्याने मला सन्मान वाटतो. तुमच्या भावनांची मी खूप कदर करतो.

# अक्षर पटेलवर दुहेरी संकट!

## इंडियाचं उपकर्णधारपद गेलं, आता दिल्लीही मोठा धक्का देणार?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू होण्याआधीच मोठ्या घडामोडी घडायला सुरुवात झाली आहे. राजस्थान रॉयल्स संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी राजस्थान रॉयल्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. आता दिल्ली कॅपिटल्स संघाचा कर्णधार अक्षर पटेलबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. आगामी हंगामात अक्षर पटेलकडून कर्णधारपदाची जबाबदारी काढून घेतली जाऊ शकते.**



त्यामुळे तो केवळ अष्टपैलू खेळाडू म्हणून खेळताना दिसू शकतो.येत्या काही दिवसात आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार सुरू होणार आहे. २०२६ मध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धेचे आयोजन टी-२० फॉरमॅटमध्ये केले जाणार आहे. या स्पर्धेत ८ संघ खेळताना दिसून येणार आहेत.

ज्यात भारत, पाकिस्तानसह, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, युएई, ओमान आणि हाँगकाँग या ८ संघांचा समावेश

## २०२५ स्पर्धेचा थरार सुरू होणार

दिल्लीला १४ पैकी ७ सामने जिंकले होते. तर ६ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या दिल्ली कॅपिटल्स संघाला पाचव्या स्थानी समाधान मानावं लागलं होतं. आगामी हंगामासाठी केएल राहुल, फाफ डू प्लेसिस आणि ट्रिस्टन स्टब्स ही नावं कर्णधारपदासाठी तुफान चर्चेत आहे.

आहे. या स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात अक्षर पटेलचा देखील समावेश करण्यात आला आहे. अक्षर पटेल याआधी भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार होता. मात्र ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे.

न्यूज २४ ने दिलेल्या वृत्तानुसार, आगामी हंगामात दिल्ली कॅपिटल्स संघाला नवा कर्णधार मिळू शकतो. गेल्या हंगामात अक्षर पटेलकडे दिल्ली कॅपिटल्स संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली होती. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना दिल्ली कॅपिटल्सने पहिल्या सत्रात दमदार कामगिरी केली होती. या संघाने ८ पैकी ६ सामने जिंकले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। सोमवार ।
। दि. 1 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय क्रीडादिन साजरा

# इच्छाशक्ती व आत्मविश्वास हेच यशाचे गमक! - पद्मश्री शितल महाजन

### शिक्षण विश्व: एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांशी साधला संवाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वतःवरचा आत्मविश्वास आणि कुटुंबाचे पाठबळ हेच माझ्या अविश्वसनीय यशाचे गमक आहे, असा कानमंत्र स्कायडायव्हिंग या साहसी खेळात जागतिक विक्रम केलेल्या पहिल्या भारतीय महिला पद्मश्री शीतल महाजन यांनी विद्यार्थ्यांना दिला.**



जागतिक हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त देशभर राष्ट्रीय क्रीडादिन साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शीतल महाजन बोलत होत्या.

यावेळी पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, प्रशासकीय व्यवस्थापक मनीष ढेकळे आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी देखील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडादिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शितल महाजन यांनी सांगितले की, स्कायडायव्हिंग सारख्या साहसी क्षेत्रात विक्रम करण्यासाठी माझ्या कुटुंबाने आणि मार्गदर्शकांनी पाठबळ दिले. या असाधारण ध्येयांचा पाठलाग करण्यासाठी नियमित व्यायाम करून मानसिक आणि शारीरिक क्षमता प्रथम सिद्ध केली. त्यामुळेच मला तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार (२००६) आणि फेडरेशन एरोनॉटिक इंटरनॅशनल कडून एफएआय सबिहा गोकेन पदक (२०१८) मिळाले. दक्षिण आणि उत्तर या दोन्ही ध्रुवांवरून स्कायडायव्हिंग करणारी सर्वात तरुण महिला आणि ३०,५०० फूट उंचीवरून जंप करणारी पहिली भारतीय महिला असा विक्रम माझ्या नावे झाला. साहसी क्रीडा प्रकारात महिला देखील भाग घेऊन शकतात असे महाजन यांनी सांगितले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांच्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. यावेळी शितल महाजन यांचा व्हिडिओ दाखविण्यात आला.

स्वागत, प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. बिंदू सैनी यांनी क्रीडादिनाचे महत्व सांगितले. मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या दिग्गज खेळाडूंमुळे भारतीय हॉकी संघाने तीन वेळा सुवर्णपदक मिळवले. त्यांचा सन्मान करणे आणि मैदानी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने दरवर्षी मेजर ध्यानचंद यांच्या जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडादिन साजरा करण्याचे जाहीर केले. ध्यानचंद यांचा कडून प्रेरणा घेऊन पद्मश्री शितल महाजन यांनी जागतिक विक्रम केला आहे. त्यांचा असाधारण प्रवास, धाडसी अनुभव आणि जागतिक स्तरावर साहसी लोकांना प्रेरणा देत आहे.

सूत्रसंचालन इयत्ता चौथी ची विद्यार्थिनी श्रुती कुर्हे व इयत्ता दहावीची तन्मयी पारखे यांनी केले. आभार अन्वी शेळके हिने मानले.

## गणपती बाप्पा मोरया! मुर्तीदान करू या!

### पथनाट्यातून जनजागृती, नागरिकांना आवाहन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिलासा संस्था आणि मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थांच्या वतीने पिंपळे गुरव येथील नदी घाटावर गणपती मूर्तीदान करा!असा संदेश पथनाट्यातून देऊन जनजागृती करण्यात आली.**

दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड, मुरलीधर दळवी,अरुण परदेशी यांनी पथनाट्यात सहभाग घेतला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पालिका क्षेत्रात नदी घाटावर पाण्याचे हौद तयार केले आहेत. त्याच ठिकाणी गणेश विसर्जन सर्वांनी करावे हा संदेश पथनाट्याच्या माध्यमातून देण्यात आला. यावेळी अण्णा जोगदंड म्हणाले,श्री चे विसर्जन पाच, सात,दहा आणि अनंत चतुर्दशी या दिवशी मोठ्या प्रमाणात होते. गणेश मूर्तीदान केल्याने अथवा हौदात विसर्जन केल्याने नदी प्रदूषण निश्चित कमी होईल. काळानुरूप माणसाने बदलले पाहिजे.! निर्माल्य नदीत न टाकता महानगरपालिकेने ठेवलेल्या निर्माल्य कुंडीत टाकावे जनतेचे प्रबोधन व्हावे म्हणून पथनाट्य घेण्यात आले आहे,असे विचार आण्णा जोगदंड यांनी पटनाटयातुन व्यक्त केले. दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक म्हणाले की,आपण सर्वांनी ज्ञान आणि विज्ञान याची सांगड घालून काम केले पाहिजे. यावेळी महानगरपालिकेचे ड प्रभागाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने म्हणाले की या दोन्ही संस्थांचे सामाजिक काम खूप चांगले आहेत, नेहमी पालिकेला वेगवेगळ्या उपक्रमात या संस्था सहभागी होत असतात दोन्ही संस्थांचे कौतुक केले. यापुढेही या संस्थांना आम्ही पालिकेच्या विविध उपक्रमात सामावून घेऊ असे माने यांनी सांगितले. यावेळी महानगरपालिकेचे ड प्रभागाचे सहाय्यक आरोग्य




अधिकारी शांताराम माने ,आरोग्य निरीक्षक रश्मी तुंडलवार, दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक ,मानवी हक्क संरक्षण जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड, कार्याध्यक्ष गजानन धाराशिवकर खेडचे अध्यक्ष शंकर नानेकर,मुरलीधर दळवी,अरुण परदेशी,सा.का.प्रदिप गायकवाड,गुणवंत कामगार काळूराम लांडगे ,ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कमलाकर जाधव ,सचिव सुरेंद्र शेळके,बेसिक टिमचे राहूल जाधव,सागर पाटील,विवेक जावीर,शिवाजी निम्हण,वर्षा नानेकर,पांडुरंग सुतार उपस्थित होते.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 - 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046